# मा. नगरसेविका श्रीमती माधुरी सहस्त्रबुद्धे यांनी पुणे म.न.पा. मध्ये सर्वसाधारण सभेत दिनांक २४ सप्टेंबर २०१३ रोजी केलेले भाषण

(विषय क्र. ३९/३७२ सप्टेंबर कार्यक्रमपत्रिका)

मा. महापौर,

गरवारे बालभवन हे संयुक्त प्रकल्पाद्वारे चालवायला द्यावयाचे आहे. त्यास 'ओम चॅरिटी ट्रस्ट'ची एकच निविदा आली आहे. त्याबाबत मी बोलणार आहे. १९७९ साल हे आंतरराष्ट्रीय बालकवर्ष म्हणून जगभर साजरं केलं गेलं. पुण्यातही त्यावेळी खूप उपक्रम झाले पण हे तात्पुरतं या वर्षापुरतं सीमित राहू नये तर नियमितपणे मुलांसाठी काम चालावं अशी कल्पना पुढे आली. गरवारे बालभवनचा जन्म या संकल्पनेतून झाला. ते आदरणीय आबासाहेब गरवारे व तेव्हाचे आयुक्त डॉ. श्री. पु.स. पाळंदे यांचं स्वप्न होतं! त्याचं सुरूवातीचं पालकत्व पुणे म.न.पा. चे आयुक्त श्री. पु.स. पाळंदे यांनी स्वीकारलं आणि १ सप्टेंबर १९८५ रोजी ते बाळ संचालिका शोभा भागवत यांच्या ओटीत टाकलं. शोभाताईंनी अतिशय सक्षमपणे व सृजनशीलतेने गेली २८ वर्षे सांभाळलं. त्याचा नावलौकिक केवळ पुण्यातच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रात झाला. या कार्याला (१) आदिशक्ती पुरस्कार - पुणे; (२) डॉ. संगमनेर फाऊंडेशन पुरस्कार; (३) रमाबाई औटी प्रतिष्ठान पुरस्कार; (४) महाराष्ट्र पालक-शिक्षक संघ पुरस्कार; (५) दीपस्तंभ फाऊंडेशन पुरस्कार - जळगाव असे अनेक पुरस्कार मिळाले.

मी या कामाशी त्यांच्या स्थापनादिनापासून संबंधित आहे. गरवारे बालभवनने आत्तापर्यंत घेतलेल्या ५६ प्रशिक्षण वर्गापैकी प्रत्येक प्रशिक्षण वर्गात मी मार्गदर्शक म्हणून गेलेली आहे. सर्व Training Process मी जवळून अनुभवलेली आहे. येथून १५ दिवसांचा कोर्स करून गेलेल्या अनेकांनी अशी बालभवने पुण्यात व महाराष्ट्रात छोट्या-मोठ्या प्रमाणात उभी केली आहेत. त्यांची संख्या आज ३५० च्या घरात आहे. यात गोवा तसेच महाराष्ट्राच्या अनेक गावांचा समावेश आहे. त्या साऱ्यांचे या Mother body शी गरवारे बालभवनशी आजही चांगले संबंध आहेत. कोर्स करून गेल्यानंतरही पुढे काही अडचणी-मार्गदर्शन लागले तर त्यासाठी स्वत: शोभाताई व इतर शिक्षक वर्गाचे सतत सहकार्य लाभते.

पुण्यात चालणाऱ्या सगळ्या बालभवनची 'बालक विकास' नावाची संस्था आहे. त्याद्वारे दरवर्षी १४ नोव्हेंबरला बालदिनी आम्ही मोठा कार्यक्रम करतो. 'आहे रे' गटातील मुलं व 'नाही रे' गटातील मुलं यावेळी संपूर्ण दिवस एकमेकांच्या संगतीत आनंदात घालवितात, तसेच आमच्या जोडलेल्या सुमारे २५ संस्था वंचित मुलांसाठी कार्यरत आहेत. त्यातील मुलांना गरवारे बालभवनच्या वर्षभरातील विविध कार्यक्रमात सामावून घेतलं जातं.

अमेरिकन प्रा. एड. रोबेक हे एक वर्षाआड येथून प्रेरणा घेण्यासाठी अमेरिकेतल्या त्यांच्या मानसशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना घेऊन बालभवन दाखवायला येतात.

श्री. काजूहिरो कामीकाडू हे जपानमधील Psychiatrists मनोविकारतज्ज्ञ व त्यांची पत्नी नावाको कामीकाडू हे जपानमधील मुलांमध्ये संशोधन करतात. मुलं शाळा का सोडतात? याचा ते अभ्यास करतात. मग ते अशा ठिकाणांचा शोध घेतात की जेथे मुलं रमतात, जिथे आनंदात राहतात, आत्मविश्वास मिळवतात, स्वप्रतिमा

+ve घडवितात. ते ही वारंवार बालभवनला भेट देतात. येथील मुलांचा होणारा भावनिक, सामाजिक विकास पाहून रोमांचीत होतात आणि म्हणूनच ते म्हणतात, 'गरवारे बालभवन जर बंद पडलं तर केवळ तुमच्या पुण्याचं किंवा महाराष्ट्राचं नुकसान होणार नाही तर ते आख्ख्या विश्वाचं नुकसान असेल.'

खरंच आजवर गेल्या २८ वर्षात सुमारे ४०,००० मुलांच्या जीवनात आनंदक्षण फुलविण्याचं काम बालभवननं केलंय. अतिशय निरलसपणे व तळमळीनं केलंय. ही सुसंस्कारीत होऊन बाहेर पडलेली मुलं ही आपली Asset आहे.

येथे समृद्ध व सुरक्षित बालपण मिळालेली, सामाजिक जाणीव रुजलेली मुलंच पुढे जाऊन स्वतंत्र काम उभारू शकतात.

हिमाचल प्रदेशात वर्षातले १० महिने बर्फ पडतं त्या किब्बर गावातील मुलांसाठी शाळा चालू करून तिला आपल्या आयुष्याचं ध्येय बनविणारा चिन्मय राणे येथेच घडतो. नुकताच तो पुण्यात येऊन गेला, सर्व मिडियाने त्याच्या या अनोख्या कामाची दखल घेतली.

अमेरिकेत मुलांसाठी रंजनकेंद्र चालविणारी सानिका बापट असो की आदिवासी मुलांमध्ये रमणारी मुक्ता गुंडी असो, अरुणाचल प्रदेशात जंगलात जाऊन संशोधन करणारी अमृता राणे, ॲग्रिकल्चरमध्ये रिसर्च करणारी गिरीजा पागे किंवा Environmental Architecture मध्ये नाव कमावणारा सौरभ फडके, सेंद्रीय शेती करणाऱ्या अदिती, अपूर्वा संचेती असो, यांना या वेगळ्या वाटा शोधायचं, निवडायचं आणि त्या वाटेवरून चालायचं धाडस हे गरवारे बालभवनने दिल आहे आणि गरवारे बालभवनचं ऋण ते मानतात. सध्याच्या बोकाळलेल्या कमालीच्या चंगळवादाच्या पार्श्वभूमीवर ही समाजोपयोगी कामे तरुणांनी उभारणं फारच दुर्मिळ पण मोलाचं आहे.

येथे सुरूवातीपासून सर्वसामान्य घरातली मुलंच येत होती व आताही येतात. कारण श्रीमंत मुलांना लागणाऱ्या क्लबच्या सोयी येथे नाहीत. (स्विमिंग पूल, पूल टेबल, कँटीन वगैरे) सुरूवातीला येथे २०० मुलं येत होती आणि प्रत्येकी १० रु. मासिक फी होती. आता मुलांची संख्या ५०० आहे आणि महागाई कैक पट वाढल्याने ३०० रु. मासिक फी आहे. सुमारे ४० ताई-दादांची टीम येथे काम करत आहे व त्यांना Seniority प्रमाणे ८०० ते २००० रु. महिना मानधन आहे हा पगार नाही. त्या ताई मुलांना स्वस्त आणि पौष्टिक खाद्य मिळावं म्हणून अनेकदा मुलांचा खाऊही स्वत:च बनवतात. एकंदरीत काटकसरीतला पण Creative असा हा उपक्रम मी म्हणेन.

आता हा प्रकल्प गरवारे बालभवन व पुणे म.न.पा. यांचा संयुक्त प्रकल्प करावयाचा आहे असे मी वाचले. पण मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छिते की, सुरूवातीपासूनच गरवारे बालभवनच्या इमारतीच्या पाटीवर, लेटर-हेडवर, व्हिजिटिंग कार्डवर इतकच काय फी च्या पावत्यांवरही पुणे म.न.पा. चेच नाव आहे. त्यामुळे सुरूवातीपासूनच हा संयुक्त प्रकल्प आहे.

- म.न.पा. ने दीड एकर जागा दिली. गरवारे यांनी इमारत बांधावयास निधी दिला. मात्र त्यानंतर म.न.पा. ने गेल्या २८ वर्षांत कुठलीही आर्थिक मदत केलेली नाही.

- मा. महापौर मला याची प्रशासनाने जरूर माहिती द्यावी की, म.न.पा. चे असे किती संयुक्त प्रकल्प चालू आहेत त्यांना म.न.पा. ने किती मदत केली आहे. शिवाय म.न.पा. ची चार बालभवने चालू होती त्याच्या इमारती पाडल्याचे ऐकिवात आहे हे खरे आहे का?

- येथे सगळा मामला मुलांकडून जमा होणाऱ्या फी चा, त्यातूनच सर्व खर्च भागविले जातात.
- म.न.पा. चा संयुक्त प्रकल्प म्हटल्यावर आणि ही संस्था Non Profit Organization असता : (१) बालभवनने भाडं भरायचं का? (२) प्रॉपर्टी टॅक्स भरायचा का? (३) पाणी पट्टी भरावयाची का?
- एकदा मुलांच्या फी मधून खर्च भागवित असताना वाढीव दराने काढलेली मागील बाकी बालभवनने कुणाकडून वसूल करावयाची? खेळून गेलेल्या मागील १० वर्षांच्या मुलांकडून? याचे तरी भान म.न.पा. ने बाळगावे.
- २००९ ला करार संपावयाच्या आधीपासून बालभवनने आपल्याशी करार नूतनीकरणाबाबत पत्रव्यवहार केला आहे. त्याचे १ मूळ पत्र आणि ६ स्मरणपत्रे आत्ता माझ्याकडे आहेत. असे असताना २००९ पासूनचे कुठलीही पूर्वसूचना न देता वाढविलेल्या भाड्याच्या रकमेपोटी काढलेली रक्कम रु. १२ लाख व मागील प्रॉपर्टी टॅक्स १३ लाख १३ हजार म्हणजेच एकूण २५ लाख १३ हजार रक्कम त्यांना आत्ता करारापूर्वी भरायला सांगणे हा सारासार अन्याय वाटतो. म.न.पा. त फक्त कायदे पाळणाऱ्यांना हा जाच आहे.

(१) एरवी Hoarding वाले म.न.पा. चं भाडं बुडवितात.

(२) ४२ नगरसेवकांना १ रु. नाममात्र भाड्याने जागा मिळतात. सध्या तेथे काय-काय चालतं ते परमेश्वरच जाणे!

(३) नेहरू स्टेडियमच्या गाळ्यांचं ६० किंवा १०० रु. भाडे ही वर्षानुवर्षे कोणी भरत नाहीत.

(४) गेल्या वर्षी मी क्रीडा समितीत असताना केलेल्या Visits च्या वेळी, पूर्वसूचना दिलेली असताना दारूच्या बाटल्या, प्रचंड घाण, पत्रे अशा दृष्यांनी क्रीडासंकुले रंगलेली आम्ही याच डोळ्यांनी पाहिली तरीही जागा अजूनही त्यांच्याच ताब्यात आहेत.

- येथे प्रवेश अर्जावर जातीचा कॉलमच नाही. मुलांना किंवा तायांना येथे जात विचारलीच जात नाही. वास्तू सुस्थितीत ठेवून होणाऱ्या संस्काराच्या कामासाठी टेंडर काढायची बुद्धी फक्त पुणे म.न.पा. लाच सुचू शकते.
- २८ वर्षात येथे एका पैशाचाही गैरव्यवहार नाही.
- नगरसेवकांची पत्रे घेऊन येणाऱ्यांची एक File मी कालच पाहिली त्या सर्वांना प्रवेश दिला गेलाय.
- उलट १९७९ साली २ एकर जागेचा ठराव झाला होता पैकी १.५ एकर जागा बालभवनला मिळाली, अर्धा एकर मिळालीच नाही. (करारात असूनही ती देण्याचा प्रयत्न करावा)
- स्केटिंग रिंकचा त्यांचा प्रस्ताव गेल्या वर्षी क्रीडा समितीत मान्य झाला होता ती करून द्यावी.
- २८ वर्षात flooring खचलंय. एकदाही रंगरंगोटी नाही, ती करून द्यावी अशी मी विनंती करते. हा करार करण्यास मा. आयुक्तांना मान्यता द्यावी. त्याच्या समितीवर स्थानिक नगरसेवकाचा समावेश असावा याबाबत कुणाचेच दुमत नाही.

१) आता २५% जागा आरक्षित राहतील असं करारात म्हटलं आहे. त्या कुणासाठी? त्याची फी कोण देणार? की त्यांना विनामूल्य प्रवेश द्यायचा? त्याचा भार कोणावर येणार? इतर मुलांची फी वाढवावी लागणार का? याबाबत करारात कुठलाही खुलासा नाही. परत शुल्क किती आकारावे यावर म.न.पा. चे नियंत्रण रहाणं, फी वाढल्याने मुले कमी झाली तर दरमहा ६०,००० रु. भाडे कुठून भरायचे हा प्रश्न बालभवनसमोर उभा राहणार आहे. एखाद्याचे हात-पाय बांधून पळ म्हणण्याचा तर हा अजब प्रकार नाही ना?

२) येथे नागरवस्तीतर्फे समुपदेशन केंद्र चालवावे असा प्रस्ताव आहे. कामाचं Duplication करण्याची काय गरज आहे? असा प्रश्न मला पडतो. सध्या शोभा भागवत, डॉ. भूषण शुक्ल, डॉ. वनारसे हे तेथे समुपदेशनाचे काम करीत आहेत. एकाच ठिकाणी अशा दोन कामांची गरज नाही असे मला वाटते.

३) सदर ठिकाणी म.न.पा. स आवश्यक असेल त्यावेळेस मोकळ्या जागेत कार्यक्रम करू शकेल असं म्हटलंय. येथे वर्षभराच्या कार्यक्रमाचं नियोजन केलेलं असतं. अशावेळी ऐनवेळी जागा उपलब्ध करून देणे म्हणजे चालू उपक्रमाला खीळ घालणं ठरेल. पार्किंगसाठी जरी जागा दिली तरी केलेलं ग्राऊंड खराब होतं हा अनुभव आहे आणि ते १५०० ते २००० रु. मोजून परत रोलिंग करून घ्यावे लागते. प्रदर्शनांनी जागा खराब झाल्याचा अनुभव संस्थाचालकांच्या गाठीशी आहे.

४) आपण ज्यांना १ रु. नाममात्र भाड्याने जागा उपलब्ध करून दिली आहे त्यांच्याकडून अशी वेळोवेळी जागेची मागणी करतो का? कोणाकोणाकडून किती वेळा जागा घेतल्या? याचा आयुक्तांनी खुलासा करावा.

- गरवारे बालभवनने कजा कजा मरू प्रकाशनाद्वारे ४८ दुर्मिळ पुस्तकं प्रकाशन करून ती अत्यल्प किंमतीत मुलांना उपलब्ध करून दिली आहेत. बाल साहित्याच्या क्षेत्रातलं हे मोठं काम आहे.
- ५६ Training Programmes घेतले आहेत त्यांच्या Expertise चा फायदा आपण म.न.पा. शाळेतील शिक्षकांचे ट्रेनिंग करण्यासाठी करून घ्यावा.
- त्यांच्या माध्यमातून ३५० बालभवन सुरू झाली आहेत.
- झोपडपट्टीतील मुलं, वेश्यांची मुलं, एडस् ग्रस्त मुले अशा सर्व प्रकारच्या मुलांना सामावून घेऊन कार्यक्रम घेतले आहेत.
- वंचित मुलांसाठी काम करणाऱ्या १६ व्यक्तींना आजवर बालभवनने पुरस्कार दिलेले आहेत.
- गेली २८ वर्षे त्यांनी नियमितपणे भाडं भरलं आहे.
  १३ लाख भाड्यातला फरक भरला आहे.
  १३ लाख प्रॉपर्टी टॅक्स भरलाय.
- आजवर Maintenance वर ३०-४० लाख रु. बालभवनने खर्च केले आहेत ह्याची म.न.पा. ने कधी दखलही घेतली नाही.

हे एक पुढच्या पिढीसाठी संवेदनशीलतेने करावयाचे काम आहे. संस्कारांचे, पिढीची जडण-घडण करण्याचे म्हणजेच Social Engineering चे Soft Skills ने करायचे काम आहे. याचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. काही गोष्टी पैसा आणि राजकारण या पलिकडे जाऊन पहाण्याची गरज असते हे यानिमित्ताने मी अधोरेखित करू इच्छिते.

तेव्हा कुठलेही अतिरिक्त निर्बंध न लादता व टॅक्सेस कमी करून या चांगल्या उपक्रमाला सर्वांनी सहकार्य करावे ही विनंती. केवळ ५ वर्षांकरिता न देता जास्त कालावधीसाठी या संस्थेला जागा उपलब्ध करून द्यावी अशी शिफारस करते.